
G61/BPS302/EE/20160528

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



A B C D

उत्तराची अयोग्य नोंद



A B C D

उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपुस्तिका दिली आहे.

5. विभाग C हा दीर्घोत्तरी स्वरूपाचा असून आवश्यक तेथे नकाशा व आकृत्या काढणे अपेक्षित आहे.

6. विभाग A साठी प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

7. विभाग B आणि विभाग C साठी उणे पद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 24)

या विभागात एकूण 48 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

1. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी काश्मीरचे राजे कोण होते ?
   a) हरि सिंग b) नवाब खान
   c) नानासाहेब पेशवे d) बहादूर शहा

2. कोणत्या साली भारत-पाकिस्तान युद्ध झालेले नाही ?
   a) 1965
   b) 1971
   c) 1999
   d) 1980

3. पाकिस्तानची राजधानी कोणती ?
   a) लाहोर
   b) कराची
   c) इस्लामाबाद
   d) पेशावर

4. 1971 साली कोणत्या देशाचा जन्म झाला ?
   a) भारत b) बांग्लादेश
   c) पाकिस्तान d) श्रीलंका

5. कारगिल युद्ध कोणत्या साली झाले ?
   a) 1950
   b) 1960
   c) 1999
   d) 1970

6. ताश्कंद करारावेळी भारताचे पंतप्रधान कोण होते ?
   a) लाल बहादूर शास्त्री b) पंडित जवाहरलाल नेहरू
   c) इंदिरा गांधी d) नरसिंह राव

7. ताश्कंद शहर कोणत्या देशात आहे ?
   a) ताजिकिस्तान
   b) चीन
   c) पाकिस्तान
   d) उजबेकिस्तान

8. तिबेटवर ताबा कोणत्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांनी सांगितला ?
   a) चीन b) भारत
   c) पाकिस्तान d) अमेरिका

9. कोणत्या दोन देशांदरम्यान पंचशील करार करण्यात आला ?
   a) भारत-पाकिस्तान b) भारत-नेपाळ
   c) चीन-पाकिस्तान d) भारत-चीन

10. 1962 मध्ये चीनने कुठल्या देशावर आक्रमण केले ?
    a) पाकिस्तान
    b) जपान
    c) मंगोलिया
    d) भारत

11. 1971 च्या भारत-पाकिस्तान युद्धात अमेरिकेने कोणाची बाजू घेतली ?
    a) भारत
    b) पाकिस्तान
    c) तटस्थ
    d) यापैकी नाही

12. 1962 मध्ये रशियाने कोणते विमान भारताला देऊ केले ?
    a) मिग - 21
    b) मिग - 32
    c) मिग - 55
    d) मिग - 99

13. रशियाची राजधानी कोणती ?
    a) मॉस्को b) बर्लिन
    c) पॅरिस d) जिनिव्हा

14. राजीव गांधींनी पंतप्रधान झाल्यानंतर पहिला परदेश दौरा कोणत्या देशाचा केला होता ?
    a) चीन b) भुटान
    c) सोव्हिएत रशिया d) पाकिस्तान

15. अमेरिकेच्या कोणत्या राष्ट्राध्यक्षांखाली भारत-अमेरिका संबंध बिघडले होते ?
    a) बराक ओबामा b) जॉर्ज डब्ल्यू बुश
    c) निक्सन d) फ्रँकलिन डी. रूसवेल्ट

16. भारताच्या 1998 मधील अणु चाचणीनंतर कोणत्या देशाने भारतावर आर्थिक निर्बंध लादले ?
    a) रशिया b) इराण
    c) इराक d) अमेरिका

17. भारताबरोबरच कोणत्या देशात तमिळ लोक जास्त आहेत ?
    a) पाकिस्तान b) श्रीलंका
    c) नेपाळ d) म्यानमार

18. 1950 मध्ये भारताने कोणत्या देशाशी शांती आणि मैत्रीचा करार केला ?
    a) श्रीलंका b) नेपाळ
    c) पाकिस्तान d) दक्षिण आफ्रिका

19. कोणते नवीन राष्ट्र निर्माण करण्यास 1971 मध्ये भारताने मदत केली.
a) पाकिस्तान
b) श्रीलंका
c) बांग्लादेश
d) म्यानमार

20. बांग्लादेशचे पुर्वीचे नाव काय होते ?
a) पुर्व पाकिस्तान
b) दक्षिण पाकिस्तान
c) उत्तर पाकिस्तान
d) पश्चिम पाकिस्तान

21. कोणत्या बॅरेजमुळे भारत-बांग्लादेशामध्ये वाद आहेत.
a) फराबका बॅरेज
b) महानदी बॅरेज
c) सिंधू बॅरेज
d) गंगा बॅरेज

22. भारत कोणत्या देशाचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे.
a) पाकिस्तान b) श्रीलंका
c) भूटान d) यापैकी नाही

23. भारताच्या नैर्ऋत्येस कोणता देश 'बेटांचा देश' म्हणून ओळखला जातो.
a) भूटान b) मालदीव
c) पाकिस्तान d) केनिया

24. अफगाणिस्तानात भारताची किती काऊन्सीलेट आहेत?
a) एक
b) दोन
c) तीन
d) चार

25. भारतातील जी.एम.आर. कंपनीचा करार कोणत्या देशाशी निगडीत होता ?
a) मालदीव
b) जर्मनी
c) अफगाणिस्तान
d) अमेरिका

26. कोणत्या देशाने भारताला ब्रदर कंट्री (Brother Country) म्हटले आहे ?
a) अफगाणिस्तान
b) नेपाळ
c) बांग्लादेश
d) यापैकी नाही

27. भारताच्या सीमेला लागून असणारी राष्ट्रे कोणती ?
a) पाकिस्तान
b) दक्षिण आफ्रिका
c) a व b
d) यापैकी नाही

28. तापी (TAPI) पाईपलाईन कोणत्या देशातून जाईल ?
a) चीन
b) पाकिस्तान
c) बांग्लादेश
d) श्रीलंका

29. हमीद करझई कोणत्या देशाचे राष्ट्राध्यक्ष होते ?
a) पाकिस्तान b) बांग्लादेश
c) अफगाणिस्तान d) नेपाळ

30. जगातील सर्वांत मोठी आंतरराष्ट्रीय संघटना कोणती ?
a) संयुक्त राष्ट्रे b) जागतिक व्यापारी संघटना
c) जी - 20 d) यापैकी नाही

31. सुरक्षा परिषदेचे कायमस्वरूपी सभासद किती देश आहेत.
a) 15
b) 20
c) 193
d) 5

32. संयुक्त राष्ट्र संघटनेचे मुख्यालय कोणत्या शहरात आहे ?
a) न्यूयॉर्क
b) जिनिव्हा
c) वॉशिंग्टन
d) नवी दिल्ली

33. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे (ICJ) मुख्यालय कोणत्या देशात आहे ?
a) अमेरिका
b) जर्मनी
c) फ्रान्स
d) यापैकी नाही

34. संयुक्त राष्ट्र संघटनेचे सध्याचे महासचिव कोण आहेत ?
a) बान-की-मून b) कोफी अन्बान
c) शशी थरूर d) बराक ओबामा

35. संयुक्त राष्ट्र संघटनेची कोणती संस्था सध्या अस्तित्वात नाही ?
a) युनिसेफ
b) IAEA
c) जागतिक आरोग्य संघटना
d) विश्वस्त परिषद

36. कोणत्या भागातील देशांचा सार्क संघटनेत समावेश होतो ?
a) उत्तर अमेरिका
b) दक्षिण अमेरिका
c) दक्षिण आशिया
d) पुर्व युरोप

37. 'सार्क' चे सचिवालय कोणत्या शहरात आहे ?
a) नवी दिल्ली
b) ढाका
c) इस्लामाबाद
d) काठमांडू

38. सार्क संघटनेतील सर्वात मोठा देश कोणता ?
a) पाकिस्तान b) नेपाळ
c) बांग्लादेश d) यापैकी नाही

39. कोणत्या देशाचा सार्क संघटनेत समावेश होत नाही ?
a) भूटान
b) चीन
c) पाकिस्तान
d) मालदीव

40. 'ब्रिक्स' (BRICS) मध्ये 'B' नावाचा देश कोणता ?
a) भूटान
b) ब्राझील
c) बांग्लादेश
d) भारत

41. आसियान संघटनेत किती देश आहेत ?
a) 5
b) 10
c) 15
d) 20

42. 'ब्रिक्स' च्या पहिल्या परिषदेस भारताचे कोणते पंतप्रधान उपस्थित होते ?
a) राजीव गांधी
b) नरेंद्र मोदी
c) मनमोहन सिंग
d) अटल बिहारी वाजपेयी

43. 'दक्षिण-दक्षिण सहकार्य' साधन्याचे कोणत्या संघटनेचे उद्दिष्ट आहे ?
a) SAARC
b) BRICS
c) IBSA
d) UN

44. युरोपियन युनियनमध्ये कोणत्या खंडातील देशांचा समावेश होतो ?
a) युरोप
b) अमेरिका
c) आशिया
d) आफ्रिका

45. युरोपीय युनियन सर्वात आधी कोणता समुदाय म्हणून ओळखला जात होता ?
a) स्टील
b) सोने
c) चांदी
d) यापैकी नाही

46. 'अपेक' संघटनेत कोणत्या देशाचा समावेश नाही.
a) भारत
b) श्रीलंका
c) a व b
d) यापैकी नाही

47. जागतिक बँक समुहात कोणती संघटना नाही ?
a) IBRD
b) IDA
c) MIGA
d) यापैकी नाही

48. गॅट करारानंतर रूपांतरित झालेली संघटना कोणती ?
a) UN
b) WHO
c) WTO
d) AU

SECTION - B (गुण : 24)

या विभागात एकूण 24 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

1. जागतिक व्यापार संघटना कोणत्या साली अस्तित्वात आली ?

2. 1962 साली कोणत्या देशाचे भारताशी युद्ध झाले ?

3. सार्क संघटनेत कोण-कोणत्या देशांचा समावेश होतो ?

4. BRICS चे विस्तारित नाव काय आहे ?

5. जागतिक व्यापार संघटना मंत्री परिषदेची बैठक किती वर्षातून पार पडते ?

6. OIC संघटनेचे विस्तारित रूप सांगा.

7. संयुक्त राष्ट्र संघटनेची आण्विक ऊर्जेसंबंधीत संघटना कोणती ?

8. संयुक्त राष्ट्र संघटनेत सध्या किती देशांचा समावेश होतो ?

9. 'ओपेक'च्या भारताच्या सभासदत्वास मुख्यतः कोणत्या देशाचा विरोध होता ?

10. ओपेक (OPEC) संघटनेचे मुख्यालय कोणत्या शहरात आहे ?

11. 'नाटो' (NATO) चे विस्तारित रूप काय ?

12. संयुक्त राष्ट्र संघटनेत सामील झालेला सर्वात नवीन देश कोणता ?

13. मिनामाटा कन्व्हेंशन कोणत्या धातूशी निगडीत आहे.

14. वर्ल्ड बँकेचे मुख्यालय कोणत्या शहरात आहे ?

15. नेहरूंच्या समाजवादी धोरणांमुळे भारताशी कोणत्या देशांचे संबंध चांगले होते ?

16. 'पी.पी.पी.' हा राजकीय पक्ष कोणत्या देशात आहे ?

17. कोणत्या दोन संघटनांची मिळून 'वर्ल्ड बँक' बनते ?

18. युरोपीय युनियनमध्ये सामील झालेला सर्वात नवीन देश कोणता ?

19. IBSA संघटनेत कोणत्या देशांचा समावेश होतो ?

20. सार्क संघटनेत सामील झालेला सर्वात नवीन देश कोणता ?

21. संयुक्त राष्ट्र संघटनेचा सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी कोण ?

22. ICJ म्हणजेच आंतरराष्ट्रीय न्यायालयात किती न्यायाधीश असतात ?

23. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे किती देश तात्पुरते सभासद असतात ?

24. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे कायमस्वरूपी सभासदत्व भारताला आहे का ?

SECTION - C (गुण : 32)

या विभागात एकूण 5 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला 8 गुण याप्रमाणे हा विभाग 32 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 100 शब्दांत लिहा.

1. भारत-पाकिस्तान संबंधाविषयी थोडक्यात माहिती सांगा.

2. भारताला सार्क संघटनेकडून कोणकोणते फायदे होतील ?

3. 'ग्रीन पीस' या गैरसरकारी संघटनेची माहिती द्या .

4. 'पंचशील करार' यातील मुद्यांचे स्पष्टीकरण द्या.

5. भारत-रशिया संबंधाविषयी थोडक्यात माहिती सांगा.